**कि.फौ. अर्ज क.463/2020, मधील नि.01 वरील आदेश.**
**सय्यद हुसेन सय्यद मोहम्मद वि. ग्रामपंचायत.**

**CNR No.MHPA-06-001577-2020.**

सदरचा अर्ज अर्जदार सययद हुसेन सययद मोहम्मद, वय 77 वर्ष, धंदा : मजुरी रा. नर्सी ना.,ता जि. हिंगोली यांनी महाराष्ट्र जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम 1969 चे कलम 13(3) नुसार त्यांच्या स्वतःच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, नर्सी ना. ता.जि. हिंगोली येथे घेण्याचा आदेश मिळविण्यासाठी केलेला आहे.

02. अर्जदाराचे थोडक्यात म्हणणे असे की, ते रा. नर्सी नामदेव ता.जि. हिंगोली येथील कायमचे रहीवाशी आहेत, अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे ते नर्सी ना. येथील रहिवाशी असून त्याचा जन्म दिनांक 9/6/1943 रोजी झालेला आहे, परंतु अर्जदाराच्या जन्म तारखेची नोंद त्यांच्या जन्म गांवी म्हणजे नर्सी ना. ग्रामपंचायत कार्यालय, ता. जि. हिंगोली येथे अनावधानाने करून घेण्यात आलेली नाही. अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. म्हणून, अर्जदाराने ग्रामपंचायत कार्यालय, नर्सी ना. ता. जि. हिंगोली यांचे दप्तरी त्यांच्या जन्माची नोंद घेण्याच्या आदेशास्तव प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

03. सदर अर्जाच्या अनुषंगाने दै. देशोन्नती वृत्तपत्राच्या माध्यमातुन हरकत व आक्षेप मागविले होते. सदर जाहिर प्रगटनाच्या अनुषंगाने प्रकरणात कोणीही हजर झालेले नाहीत.

04. सदर अर्जाच्या अनुषंगाने गैरअर्जदारामार्फत ग्रामविकास अधिकारी नर्सी ना. ता.जि. हिंगोली यांनी जन्माची नोंद नसल्याचे प्रमाणपत्र निशाणी 11 वर दाखल करून, अर्जदाराच्या जन्माची नोंद त्यांच्या कार्यालयाच्या दप्तरी नसल्याचे कळविले.

05. अर्जातील कथने पाहता खालील मुद्दे उपस्थित होतात.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| 01) अर्जदार स्वतःच्या जन्माची नोंद घेण्याचा आदेश मिळविण्यास पात्र आहे काय? | ...होय. |
| 02) काय आदेश? | .... अर्ज मंजुर करण्यात येते. |

## कारणमिमांसा

**मुद्दे कमांक 1 व 2:**

06. अर्जदाराने स्वतःचे शपथपत्र नि.क्र.10 वर दाखल केले. त्यांचे स्वतःचे आधारकार्डची प्रमाणीत प्रत निशाणी 13 वर दाखल केली. याशिवाय त्यांच्या जन्माची नोंद नसल्याबाबत ग्रामपंचायत नर्सी ना. ता.जि. हिंगोली यांनी दिलेले प्रमाणपत्र निशाणी क्र.11 वर दाखल केले आहे. दै. देशोन्नती समाचार वृत्तपत्रातील दि.15/12/2020 रोजीचे जाहिर प्रगटन निशाणी कं. 09 वर दाखल केले. जि.प. शाळा यांनी दिलेल्या शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र नि.क्र.12 वर दाखल केले. शाळा सोडल्याचे प्रमाणपत्राचा अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदाराचे जन्म दिनांक 9/6/1943 आहे. याशिवाय पुरावा देणे नाही अशी पुरसीस निशाणी क्र.14 वर दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या कागदपत्र निशाणी 11 चे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, गैरअर्जदार ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय नर्सी ना. यांचे नोंद नसल्याचे प्रमाणपत्र अर्जदारास दिलेले आहे. त्यावरून त्याने अर्जदाराच्या जन्म तारखेची नोंद त्यांचे कार्यालयात आढळून येत नसल्याचे प्रमाणपत्र दिले. सबब त्यांच्याविरूध्द एकतर्फा आदेश पारीत करून अर्ज चालविला.

07. अर्जदाराने स्वतः सरतपासात कथन केले आहे की, त्यांची जन्म तारिख 9/6/1943 अशी आहे. त्यांच्या साक्षीप्रमाणे त्यांचा जन्म दि. 9/6/1943 रोजी त्यांचे जन्म गांवी म्हणजेच नर्सी ना. येथे झाला. परंतु, अनावधानाने त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, नर्सी ना. ता. जि. हिंगोली येथे ते करून घेवू

शकले नाहीत.

08. वृत्तपत्रा मध्ये जाहिर प्रगटन देवून देखील कोणीही हजर होवून अर्जास उजर घेतली नाही. अर्जदाराने त्यांचे न्यायालयात निशाणी 10 अन्वये दिलेल्या शपथपत्रामध्ये त्यांचा जन्म दिनांक 09/06/1943 रोजी मौजे नर्सी ना. ता.जि. हिंगोली येथे झाला असल्याचे सांगीतले. त्यामुळे सदर तारखेच्या जन्माची नोंद घेण्याचे निर्देश संबंधीत कार्यालयास दिल्यास संयुक्तिक होईल. अर्जातील तथ्यांवरुन अर्जदार यांच्या जन्म तारखेची नोंद घेणे आवश्यक दिसते. महाराष्ट्र जन्म मृत्यू नोंदणी अधिनियमातील तरतुदी नुसार अर्ज मंजूर करता येतो. अर्जनामंजूर करण्यासारखी कोणतीही कारणे आजमितीस वाटत नाहीत. वरील चर्चेस अनुषंगून खालील आदेश पारित करण्यात येतो.

**आदेश**

1) अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

2) याव्दारे असे आदेशित करण्यात येते की, गैरअर्जदार ग्रामपंचायत नर्सी ना. ता.जि. हिंगोली, यांनी अर्जदार सय्यद हुसेन पि. सय्यद मोहमद रा.नर्सी–नामदेव यांच्या जन्माची तारीख 09/06/1943 अशी नोंद त्यांच्या कार्यालयात हाताळण्यात येणा–या संबंधीत रजिस्टरमध्ये नियमाप्रमाणे शुल्क आकारून घ्यावी.

3) येणे प्रमाणे अर्ज निकाली काढण्यात आला.

Irfan Ali Khan Yousuf Ali Khan
Digitally signed by Irfan Ali Khan Yousuf Ali Khan
Date: 2021.01.27 16:10:13 +0530

(आय.ए.वाय.ए.खान)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.03, हिंगोली.

दिनांक :27/01/2021.